MHAU070023052022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०२२ नि.क्र.१ खालील आदेश**

शहा एजाज सिराज **विरुध्द मुख्याधिकारी,** नगरपरिषद, गंगापुर

**(दिनांक ०७.१२.२०२२)**

सदरील अर्ज अर्जदार **शहा एजाज सिराज** यांनी त्यांचा जन्म दिनांक १६/०४/१९९४ रोजी राहत्या घरी मौजे गंगापुर, ता. गंगापुर येथे झाल्याबाबतची नोंद जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरला घेण्याबाबत आदेश होणेकामी जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) नुसार दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, त्यांचा जन्म दि. १६/०४/१९९४ रोजी त्यांच्या राहत्या घरी मौजे गंगापुर येथे झालेला आहे. अर्जदारास जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता शासकीय व निमशासकीय कामासाठी आहे. तसेच त्याने संबंधित नगर परिषद गंगापुर, यांचेकडे जन्म प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला असता अर्जदारास संबंधित कार्यालयाने अर्जदाराच्या जन्माची नोंद नसल्याबाबत दि.११/१०/२०२२ रोजी कळविले आहे. तसेच **त्यांच्या** जन्माची नोंद जन्म मृत्यू रजिस्टरला घेण्यासाठी बराच अवधी उलटुन गेलेला असल्याने नोंद करणे कामी न्यायालयाच्या आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदारास सांगितले. त्यानुसार अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. सामनेवाल्यास सदर अर्जाची नोटीस बजावण्यात आली. सदरील अर्ज एकतर्फा चालविण्यात आला आहे. तसेच दैनिक वर्तमानपत्र दैनिक आदर्श गांवकरी या वर्तमानपत्रात दिनांक १६/१०/२०२२ रोजी जाहीर प्रकटणाची नोटीस प्रसिध्द करुन अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांचा जन्म दिनांक १६/०४/१९९४ रोजीची जन्माची

नोंद होणेकामी कुणाचा आक्षेप/उजर असल्यास ३० दिवसाच्या मुदतीत आक्षेप/उजर नोंदवावे असे कळविले होते. सदर जाहीर प्रकटन प्रसिध्द केल्यापासुन त्यात नमुद मुदतीत तसेच आजपावेतो कुणीही आक्षेप/उजर नोंदवलेली नाही. त्यामुळे अर्जदाराचा सदर अर्जातील मागणी विनाविवादीत राहिली.

०४. अर्जदार **शहा एजाज सिराज** यांनी त्याचा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.०९) अन्वये दाखल केले आहे. तसेच अर्जदाराने **त्याच्या** जन्माची नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र **नि.क्र.४/१** वर, त्याचे स्वतःचे आधार कार्डची पडताळणी प्रत **नि.क्र.४/२** वर, अर्जदाराने मौलाना आझाद ज्युनियर आर्ट, सायन्स व कॉर्मस कॉलेज, औरंगाबाद कॉलेज ने दिलेले लिव्हींग सर्टीफिकीट ची पडताळणी प्रत **नि.क्र.४/३** वर तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्राची प्रत व गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्टस अण्ड सायन्स, क्लीआर्क, औरंगाबाद यांचे ट्रान्सफर सर्टीफिकेट यादी नि.क्र. १२ सोबत दाखल केलेले आहेत. त्यात त्यांची जन्म दिनांक १६.०४.१९९४ असल्याचे नमुद आहे. तसेच त्यांनी **नि.क्र.१३** वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच लेखी पुरावा बदं पुरसिस **नि.क्र.१०** वर दाखल केली आहे.

०५. अर्जदाराचे शपथपत्रावरुन, आधार कार्ड, लिव्हींग सर्टीफिकीट वरुन असे दिसते की, अर्जदार **शहा एजाज सिराज** यांचा जन्म दिनांक १६/०४/१९९४ रोजी झालेला आहे. तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद गंगापुर यांनी दि.११/१०/२०२२ रोजीचे दिलेल्या प्रमाणपत्रावरुन नगर परिषद गंगापुर जन्म–मृत्यू विभागाच्या अभिलेखात **शहा एजाज सिराज यांचा** जन्म दिनांक १६/०४/१९९४ **रोजी** जन्माची नोंद दिसुन येत नाही.

०६. या अगोदर जन्म मृत्यू नोंद करण्यासंदर्भातील सर्व प्रक्रिया व कार्यवाही तहसिलदार यांच्याकडे चालत होती. परंतु मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर

खंडपीठाने फौजदारी पी.आय.एल. नं.०४/२०१३ फ्रिडम फर्म थ्रु निनसी मोहन बेबी विरुध्द चाईल्ड वेलफेअर कमिटी, नागपुर या प्रकरणातील न्यायनिर्णय देतेवेळी जन्म मृत्यू नोंद कायदा, १९६९ कलम १३ (३) नुसारची प्रकरणे न्यायदंडाधिकारी व मुख्य न्यायदंडाधिकारी/महानगर न्यायदंडाधिकारी यांचे समोर चालतील असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदरील प्रकरणात आदेश करण्याचा न्यायालयास अधिकार आहे.

०७. वरील पुराव्यावरुन हे स्पष्टपणे दिसते की, अर्जदारास त्यांच्या शासकीय कामासाठी व निमशासकीय कार्यालयात प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. परंतु अर्जदाराच्या जन्माची नोंद नगरपरिषद, गंगापुर येथील जन्म/मृत्यू नोंदणी रजिस्टरला केलेली नाही. त्यामुळे योग्य ती फी आकारुन **त्यांच्या** जन्माची नोंद शासन दप्तरी घेणेबाबत जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय नगरपरिषद गंगापुर, ता. गंगापुर यांना आदेश देणे योग्य होईल. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. मुख्याधिकारी, नगरपरिषद गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदार **शहा एजाज सिराज** यांनी त्यांचा जन्म दिनांक १६/०४/१९९४ रोजी राहत्या घरी गंगापुर येथे झाल्याबाबतची नोंद त्यांचेकडील जन्म–मृत्यू रजिस्टरला करुन घ्यावी.

०३. अर्जदारास आदेश देण्यात येतो की, सदरील कार्यवाहीसाठी निश्चित केलेले शुल्क परस्पर नगरपरिषद गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांचेकडे जमा करावे.

Sd/–

(श्रीमती पी. एस. भोसले)

दिनांक :–०७/१२/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गंगापुर

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. R. S. Dabhade. |
| Court | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Gangapur. |
| Order Date | : | 07/12/2022. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 07/12/2022. |
| Order uploaded on | : | 16/12/2022. |